## निवडक

### दिल्ली पोलिस भासवून ४.५ लाखांची फसवणूक

■ टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. ८ :** कार्मोणा येथील फिलोमिना डिकोस्टा फुर्तादो यांना व्हिडीओ कॉल करून दिल्ली पोलिस असल्याचे भासवून ४.५ लाखांची फसवणूक करण्यात आली. मनी लाँड्रिंग प्रकरणात सहभाग असल्याचे सांगत ही फसवणूक करण्यात आली. याप्रकरणी डिकोस्टा फुर्तादो यांनी तक्रार केल्यानंतर संशयिताविरोधात कोलवा पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

संशयित आरोपी दीपेश जोशी याने ११ एप्रिल रोजी व्हिडीओ कॉल करत फिलोमिना डिकोस्टा फुर्तादो व एदुआर्दो फुर्तादो यांना आपण दिल्लीतून पोलिस ठाण्यातून बोलत असल्याचे सांगितले. तसेच तक्रारदारांचा मनी लॉन्ड्री प्रकरणात सहभाग असल्याचे सांगितले. या प्रकरणातून सुटका करून घ्यावयाची असल्यास सिद्धेश अजय या नावावरील बँक खात्यात साडेचार लाख रुपये जमा करण्यास सांगितले. भीतीपोटी तक्रारदारांकडून सदर बँक खात्यात साडेचार लाख रुपयांची रक्कम जमा करण्यात आली. मात्र, आपली फसवणूक झाली असल्याचे लक्षात आल्यानंतर तक्रारदार फुर्तादो यांनी कोलवा पोलिस ठाण्यात याबाबत तक्रार दाखल केली आहे. तक्रारीनुसार कोलवा पोलिसांकडून संशयित दीपेश जोशी याच्या विरोधात गुन्हा नोंद करून तपास सुरू करण्यात आला आहे.

### शिरोली येथे उद्या 'निराधार' नाटक

■ टीम दैनिक हेराल्ड

**साखळी, दि. ८ :** शिरोली केरी-सत्तरी येथील श्री सातेरी देवस्थानात शनिवार दि.१० मे रोजी रात्री ९ वाजता सन्मित्र हौशी नाट्य मंडळ शिरोलीतर्फे रमाकांत पायाजी लिखित व भिमनाथ चोर्लेकर दिग्दर्शित 'निराधार' हे सामाजिक तीन अंकी नाटक सादर करण्यात येणार आहे. या नाटकाचे निर्माते प्रकाश विठ्ठल गावस व सहनिर्माते गोविंद रावजी गावस आहेत. या नाटकात प्रकाश शेटकर, पांडुरंग शेटकर, सतीश गावस, संजय शेटकर, कमलाकांत गावस, विजय गावस, काशिनाथ गावस व सुवर्णा गावकर यांच्या भूमिका आहेत. हार्मोनियम साथ गुरुदास बाणावलीकर, तबलासाथ योगेश शिरवलकर व पार्श्वसंगीत विराज घाडी यांचे आहे. केळबाय भूमिका रंगमंच पर्येची रंगमंच व्यवस्था आहे.

# भटक्या कुत्र्यांसाठी कायमस्वरूपी 'डॉग शेड'

- फोंडा पालिकेचा निर्णय
- बांदोरामध्ये २०० चौ. मी जागेत उभारणार निवारा शेड

■ टीम दैनिक हेराल्ड



**फोंडा, दि. ८ :** गेल्या महिन्यात भटक्या कुत्र्यांच्या हल्ल्यात १९ महिन्यांच्या बालकाचा दुर्दैवी मृत्यू झाल्यानंतर, फोंडा नगरपरिषद (पीएमसी) प्रशासनाने या गंभीर समस्येकडे लक्ष देत ठोस पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. परिषदेकडून वारखंडे परिसरातील बांदोरा कोमुनिदादमध्ये सुमारे २००० चौरस मीटर क्षेत्रावर भटक्या कुत्र्यांसाठी कायमस्वरूपी निवारा (डॉग शेड) उभारण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

कृषी मंत्री रवी नाईक यांच्या पुढाकाराने डॉग शेडसाठी आवश्यक जागा उपलब्ध करून देण्यासाठी कार्यवाही सुरू असल्याची माहिती पीएमसीचे अध्यक्ष आनंद नाईक यांनी दिली. बुधवारी पार पडलेल्या नगरपरिषदेच्या बैठकीनंतर ते पत्रकारांशी बोलत होते.

सध्या भटक्या कुत्र्यांच्या नसबंदी प्रकल्पावर दरमहा सुमारे ४० ते ४५ हजार रुपयांचा खर्च होत असल्याचे नाईक यांनी सांगितले. कुत्र्यांना खाण्यासाठी अन्न ठराविक ठिकाणी द्यावे. स्थानिक नागरिकांकडून कच्च्या चिकनच्या अवशेषांमुळे कुत्र्यांमध्ये आक्रमकता वाढत असल्याच्या तक्रारी येत आहेत. त्यामुळे नागरिकांनी अशा प्रकारच्या अन्नवस्तू सार्वजनिक ठिकाणी टाकणे टाळावे, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

संबंधित बैठकीत घरकर व व्यावसायिक कर वाढवण्याचा निर्णयही एकमताने घेण्यात आला. १९९६ मध्ये प्रति चौरस मीटर ५ रुपये इतका असलेला घरकर, २०१९ मध्ये ७ रुपयांवर गेला होता. आता तो केवळ ३ रुपयांनी वाढवून १० रुपये करण्यात आला आहे. गोव्यातील इतर नगरपरिषदांमध्ये हा दर २० रुपयांपेक्षा अधिक आहे, त्यामुळे फोंडा नगरपरिषदेचा कर अजूनही तुलनेने कमीच आहे, असे नाईक यांनी स्पष्ट केले. व्यावसायिक करातही ५ रुपयांची वाढ करण्यात आली आहे.

शहरातील जलकुंभ आणि मुख्य नाल्याचे प्रदूषण रोखण्यासाठी नागरिकांनी आपल्या घरातील सांडपाणी व्यवस्थापनासाठी आवश्यक जोडणीसाठी अर्ज करावेत, असेही नाईक यांनी सांगितले. सरकारकडून सांडपाणी जोडणी मोफत देण्यात येत असल्याने नागरिकांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले.

# न्हावेली अपघातातीत जखमी युवकाचा मृत्यू

■ टीम दैनिक हेराल्ड




**न्हावेली :** अपघातात सापडलेली मोटरसायकल व दुचाकी.

**डिचोली, दि. ८ :** न्हावेली साखळी येथील विविधा उच्च माध्यमिक हायस्कूलजवळ झालेल्या ट्रक व मोटरसायकल यांच्यातील अपघातात पेरवाडा न्हावेली साखळी येथील पीयूष दत्ताराम गावस (१६ वर्षे) या गंभीर जखमी झालेल्या युवकाचे आज गुरुवारी सकाळी उपचारादरम्यान गोमेकॉत निधन झाले. सदर अपघात बुधवारी संध्याकाळी ५.४५ वाजण्याच्या सुमारास घडला होता.

उपलब्ध माहितीनुसार संध्याकाळी न्हावेली येथून कोठंबी येथे जाणाऱ्या रस्त्यावर विविधा उच्च माध्यमिक हायस्कूलजवळ असलेल्या एका वळणावर सुर्ल येथे जाणाऱ्या जीए ०४ टी २५५१ या ट्रकच्या मागील चाकाला समोरून न्हावेली येथे येणाऱ्या पीयूष गावस याच्या स्प्लेंडर मोटरसायकलची जोरदार धडक बसली. या धडकेत दुचाकीची बरीच मोडतोड झाली. तर पीयूष याला गंभीर दुखापत झाली.

या घटनेची माहिती डिचोली पोलिसांना मिळताच साखळी पोलिस आऊट पोस्टमधील पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन घटनेचा पंचनामा केला. तर गंभीर जखमी अवस्थेतील पीयूष याला सर्वप्रथम साखळीत व नंतर पुढील उपचारांसाठी बांबोळी येथे गोमेकॉ इस्पितळात पाठविण्यात आले.

गोमेकॉत उपचार सुरू असतानाच पीयूष याचा आज गुरूवारी सकाळी मृत्यू झाला. या घटनेमुळे न्हावेली गावावर शोककळा पसरली आहे. पीयूष हा दहावीच्या परीक्षेत उत्तीर्ण होऊन अकरावीसाठी त्याने न्हावेली येथील विविधा उच्च माध्यमिक विद्यालयात प्रवेश घेतला होता. पुढील शिक्षणाचे त्याचे स्वप्न अधुरेच राहिले. या अपघातप्रकरणी ट्रकचालक नीरज विश्वनाथ गावस (वय ३८, रा. दुरीगवाडा न्हावेली) याच्याविरोधात गुन्हा नोंदविण्यात आला आहे. डिचोली पोलिस निरीक्षक विजय राणे यांच्या मार्गदर्शनाखाली डिचोली पोलिस अधिक तपास करीत आहेत.

# भारताच्या सशस्त्र दलांना मानवंदना




■ टीम दैनिक हेराल्ड

**फोंडा, दि. ८ :** पाकिस्तानमधील दहशतवाद्यांच्या अड्ड्यांवर भारतीय वायुदलाने केलेल्या यशस्वी कारवाईचे फोंडा येथील नागरिकांनी स्वागत केले. फोंडा बसस्थानकावर आयोजित कार्यक्रमात नागरिकांनी एकत्र येऊन देशाच्या संरक्षण दलांप्रती कृतज्ञता व्यक्त केली.

यावेळी माजी खासदार आणि एनआरआय आयुक्त ॲड. नरेंद्र सावईकर म्हणाले की , पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्याला लष्कराने दिलेले प्रत्युत्तर प्रत्येक भारतीयाच्या मनात अभिमान निर्माण करणारे आहे. ही कारवाई सरकारच्या ठाम निर्णयक्षमतेचे उदाहरण आहे.

देशाच्या सुरक्षिततेसाठी लष्कर जे कार्य करत आहे, त्यामागे संपूर्ण देश उभा आहे, असेही सावईकर यांनी ठामपणे सांगितले. त्यांनी 'ऑपरेशन सिंदूर' यशस्वीपणे पार पाडल्याबद्दल लष्कराचे अभिनंदन केले आणि भविष्यातही देशवासियांनी एकजुटीने देशाच्या पाठीशी उभे राहावे, असे आवाहन केले.

या कार्यक्रमात मोहन शंकर यांनी आपले विचार मांडताना म्हटले की, देशातील निरपराध नागरिकांवर दहशतवादी हल्ले होणे अत्यंत दुर्दैवी आहे. अशा प्रसंगी लष्कराला पाठिंबा देणे ही आपली राष्ट्रीय जबाबदारी आहे. डॉ. केतन भाटीकर यांनी नागरिकांमधील ऐक्याचे महत्त्व अधोरेखित केले.

कार्यक्रमास जिल्हा पंचायत सदस्य प्रिया च्यारी, विनोद नागेशकर, अमीन कुरेशी, मुतुराज देशमुख आणि विनीत सिंग आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुनील देसाई यांनी केले.

# मडगावमध्ये व्हॅक्यूम सीवरेज तंत्रज्ञानाची व्यवहार्यता तपासणार

■ टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. ८ :** मडगाव शहरातील सांडपाणी व्यवस्थापनाच्या कार्यक्षमतेवर लक्ष ठेवणाऱ्या उच्च न्यायालयाच्या निर्देशांच्या पार्श्वभूमीवर, कोअर कमिटीने सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सांडपाणी शाखेला शहरातील अत्यंत दाट लोकवस्तीच्या भागांमध्ये व्हॅक्यूम सीवरेज तंत्रज्ञानाचा अभ्यास करून १५ मेपर्यंत अहवाल सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

कोअर कमिटीची बैठक मडगाव नगरपरिषदेचे अभियंता दीपक देसाई यांच्या अध्यक्षतेखाली नुकतीच पार पडली. ही समिती मुख्याधिकारी (अतिरिक्त) मेलविन वाझ यांच्या अनुपस्थितीत कार्यरत होती. व्हॅक्यूम सीवरेज प्रणाली, जी सामान्यतः घनदाट किंवा सखल भागांमध्ये वापरली जाते, जिथे पारंपरिक गुरुत्वाकर्षणाधारित सांडपाणी व्यवस्था अशक्य असते, त्या संदर्भात ही दिशा ठरवण्यात आली आहे. या तंत्रज्ञानाचा अभ्यास सांडपाणी नाल्यांमध्ये व नैसर्गिक जलस्त्रोतांमध्ये मिसळण्याचे प्रमाण रोखण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरेल.

यासोबतच, सार्वजनिक बांधकाम विभागाला मडगावमधील सांडपाणी व्यवस्थेचा अद्ययावत नकाशा तयार करण्याची जबाबदारी देण्यात आली आहे. सदर नकाशा मडगाव नगरपरिषद आणि सीवरेज अँड इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन ऑफ गोवा लिमिटेड यांच्या समन्वयाने तयार करण्यात येणार असून, ८ मे ही अंतिम मुदत ठरवण्यात आली आहे.

दरम्यान, नगरपरिषदेने अलीकडेच नाल्यांमध्ये सांडपाणी मिसळल्याच्या आरोपाखाली १५४ घरांना नोटिसा बजावल्या होत्या. या नोटिसींचा आढावा कोअर कमिटीने घेतला असून, अनेक घरमालकांनी सांडपाणी व्यवस्थेशी जोडणी झाल्याचे प्रतिज्ञापत्र दिले आहे. मात्र, सार्वजनिक बांधकाम विभागाला प्रत्यक्ष पाहणी करून जोडणी झालेल्या आणि न झालेल्या घरांची वस्तुनिष्ठ माहिती सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

याच पार्श्वभूमीवर, मडगावमधील काही भागांमध्ये अनधिकृत घरे व झोपडपट्ट्यांतून बेकायदेशीरपणे सांडपाणी नाल्यांत सोडले जात असल्याचे उघडकीस आले आहे. विशेषतः मलभाट परिसरात झालेल्या तपासणीत स्थलांतरित कामगारांसाठी उभारलेल्या तात्पुरत्या झोपड्यांत कोणतीही सांडपाणी व्यवस्था नसल्याचे स्पष्ट झाले. ही घरे सामान्य पाण्याचा स्रोत व वीज वापरत असताना, त्यांचे सांडपाणी थेट उघड्या नाल्यांमध्ये सोडले जात होते.

महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांनी मान्य केले की मलभाटमधील परिस्थिती ही शहरातील व्यापक समस्येची झलक असू शकते. अन्य भागांमध्येही साळ नदीच्या आसपास असणाऱ्या नाल्यांच्या किनाऱ्यांवर अशाच प्रकारच्या झोपड्या असल्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. एका प्रकरणात, जमिनीच्या मालकाने आपली सखल जमीन अनेक छोट्या युनिट्समध्ये विभागून भाड्याने दिली होती, मात्र या कोणत्याही युनिटमध्ये औपचारिक सीवरेज प्रणालीशी जोडणी नव्हती. या गंभीर स्थितीतही, महानगरपालिकेने अजूनही अशा अनधिकृत संरचनांची यादी किंवा त्यांना सीवरेज जाळ्यात आणण्यासाठी ठोस योजना तयार केलेली नाही, अशी माहिती समोर आली आहे. उच्च न्यायालयाच्या निरीक्षणाखाली काम करणाऱ्या संस्थांनी संवेदनशील भागांमध्ये समन्वयाच्या अभावावरही लक्ष वेधले आहे. १५ मेपर्यंत प्रलंबित नोटिसांवर अंतिम निर्णय घेण्याची अपेक्षा आहे, तसेच कोअर कमिटीवर यासाठी तांत्रिक उपायांची शिफारस करण्याची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. अभ्यासाधीन व्हॅक्यूम सीवरेज तंत्रज्ञान ही अशा भागांसाठी प्रभावी पर्याय ठरू शकतो, जिथे पारंपरिक प्रणाली अमलात आणणे कठीण आहे.संबंधित अहवाल आणि नकाशे प्राप्त झाल्यानंतर, महिन्याच्या अखेरीस कोअर कमिटी पुन्हा बैठक घेणार असून, पुढील पावले निश्चित केली जातील, असे अधिकाऱ्यांनी सांगितले.

# समुद्रकिनाऱ्यावरच्या सुरक्षिततेसाठी महत्त्वाच्या सूचना

■ टीम दैनिक हेराल्ड

**कळंगुट, दि. ८ :**

गोव्यात उन्हाळ्याच्या सुट्ट्यांदरम्यान पर्यटकांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढत असताना, वाढत्या उष्णतेच्या पार्श्वभूमीवर समुद्रकिनाऱ्यावर सुरक्षिततेची खबरदारी घेणे अत्यंत आवश्यक बनले आहे. याच अनुषंगाने 'दृष्टी मरीन', ही राज्यातील अधिकृत जीवनरक्षक सेवा संस्था, यांनी पर्यटक आणि स्थानिकांसाठी उन्हाळी पर्यटनविषयक सूचना जारी केल्या आहेत.

या सुचनांमध्ये उष्ण हवामानात समुद्रकिनाऱ्यावर सुरक्षित राहण्यासाठी काही महत्त्वाच्या टिप्स दिल्या आहेत. त्यामध्ये भरपूर पाणी पिणे, त्वचेचे संरक्षण करण्यासाठी सनस्क्रीनचा वापर, डिहायड्रेशन टाळण्यासाठी टोपी, छत्री आणि पाण्याची बाटली जवळ बाळगणे यांचा समावेश आहे. समुद्रकिनारी सावलीसाठी छत्रीचा वापर करणे, तसेच दुपारी १२ ते ३ या काळात थेट सूर्यप्रकाशात जाणे टाळणे आवश्यक आहे, असेही 'दृष्टी मरीन'च्या जीवनरक्षकांनी स्पष्ट केले आहे.

गोव्याच्या विविध समुद्रकिनाऱ्यांवर सध्या ३५ जीवनरक्षक टॉवर्स कार्यरत आहेत. कोणतीही आपत्कालीन परिस्थिती उद्भवल्यास जवळच्या टॉवरमधील प्रशिक्षित जीवनरक्षकांची मदत घेणे हा सुरक्षित उपाय आहे, कारण प्रत्येक टॉवरमध्ये आवश्यक ती प्रथमोपचार व्यवस्था उपलब्ध आहे.

### काय रावे आणि करू नये' ?

**नेहमी दृष्टी मरीनने चिन्हांकित केलेल्या लाल आणि पिवळ्या झेंड्यांदरम्यानच पोहा.शक्य असल्यास जीवनरक्षक टॉवरजवळ पोहण्यास प्राधान्य द्या.सकाळी ७:३० ते संध्याकाळी ६ या वेळेत समुद्रकिनाऱ्यावर जाणे अधिक सुरक्षित, कारण या वेळेत जीवनरक्षक ड्युटीवर असतात.सनस्क्रीन, टोपी, छत्री आणि पाण्याची बाटली सोबत नेण्याची काळजी घ्य जर मूल हरवले तर घाबरू नका; तात्काळ जवळील जीवनरक्षकाला माहिती द्या.पाण्याच्या प्रवाहात अडकले असल्यास घाबरू नका, तरंगत राहा आणि मदतीसाठी इशारा द्या.समुद्रात एकटे पोहणे टाळा. अडचण आल्यास हात हवेत उंचावून मदतीसाठी हाका मारा.**

**पोहण्याच्या क्षेत्राबाहेर, विशेषतः लाल झेंड्यांनी सूचित केलेल्या धोकादायक ठिकाणी जाऊ नका जर तुम्ही प्रशिक्षित जीवनरक्षक नसाल, तर कोणालाही वाचवण्यासाठी स्वतः धोका घेऊ नका. त्वरित अधिकृत जीवनरक्षकांना कळवा.**

*** समुद्राच्या रेषेपासून किमान १० मीटर अंतर राखा आणि जीवनरक्षकांच्या सूचनांचे पालन करा मुलांना पाण्याजवळ एकटे जाऊ देऊ नका - पाण्याची खोली कितीही कमी असली तरीही दक्षता आवश्यक आहे.दारूच्या नशेत समुद्रात उतरणे टाळा, हे अत्यंत धोकादायक आहे.**

# वेस्टर्न बायपासजवळील पूरस्थिती रोखण्यासाठी सेरावलीत पाहणी

■ टीम दैनिक हेराल्ड



**मडगाव, दि. ८ :** सेरावली येथील वेस्टर्न बायपास उड्डाणपुलाखालील आणि एसजीडीपीए घाऊक मासळी बाजारजवळील दोन संवेदनशील ठिकाणी संभाव्य पूरस्थिती टाळण्यासाठी सोमवारी महत्त्वाची संयुक्त पाहणी करण्यात आली. आगामी पावसाळ्यापूर्वी तातडीने प्रतिबंधात्मक उपाययोजना राबवण्याचे उद्दिष्ट या पाहणीमागे होते.

बाणावलीचे आमदार वेंझी व्हिएगस, सेरावली पंचायतीचे प्रतिनिधी, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी आणि एमव्हीआर कंत्राटदार यांच्या उपस्थितीत ही पाहणी झाली. पाहणीदरम्यान सुमारे ६0हजार घनमीटर इतके उत्खनन केलेले साहित्य उड्डाणपुलाखाली साचले असल्याचे निदर्शनास आले. या ढिगाऱ्यामुळे पावसाचे नैसर्गिक पाणी वाहण्याचे मार्ग अडवले गेले आहेत.

अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले की, कंत्राटदाराने आवश्यक यंत्रसामग्री एकत्र केल्यानंतर २० दिवसांच्या आत साचलेली माती पूर्णपणे हटविण्यात येईल. हे कार्य वेस्टर्न बायपास बांधकामाआधी या सखल शेती क्षेत्रात सुरू होते.

या भागात बायपास बांधकामादरम्यान कंत्राटदाराच्या वाहनांसाठी तात्पुरते सेवा रस्ते तयार करण्यात आले होते, त्यामुळे मातीचा साठा वाढला आहे.

पाहणीदरम्यान एक महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला की सेरावली आणि बाणावली ग्रामस्थांचे प्रतिनिधित्व असलेली एक विशेष समिती स्थापन केली जाईल. या समितीत सरकारी अधिकारी आणि कंत्राटदारांचा समावेश असेल, तसेच कामकाजावर देखरेख केली जाईल.

स्थानिक प्रतिनिधींनी पाहणीदरम्यान काही विशिष्ट ठिकाणांकडे लक्ष वेधले जिथे पाण्याचा प्रवाह अडवला जात आहे. या अडथळ्यांमुळे साल नदीत पावसाचे पाणी साचून राहते व परिणामी शेतजमिनी जलमय होतात तसेच आसपासच्या घरांनाही धोका निर्माण होतो.

तपासणीत नुकसानग्रस्त बंधारेही समोर आले असून त्यांची तात्काळ दुरुस्ती आवश्यक असल्याचे निष्पन्न झाले. याशिवाय, जलवाहिन्यांच्या जवळ पडलेला बांधकाम ढिगारा नदीच्या प्रवाहात अडथळा निर्माण करत असल्याचीही नोंद घेण्यात आली आहे.

आमदार व्हिएगस यांनी अधिकाऱ्यांना १० जूनपर्यंत सर्व काम पूर्ण करण्याची अंतिम मुदत दिली आहे. तोपर्यंत मान्सूनपूर्व पावसाशिवाय इतर काही घडू नये, हीच आशा आहे, असे सांगून त्यांनी वेळेवर उपाययोजना न झाल्यास संभाव्य पुराबाबत चिंता व्यक्त केली.

दरम्यान, मुंगुळमधील स्थानिक नागरिकांनीही काही दिवसांपूर्वी आपल्या परिसरातील बांधकाम ढिगाऱ्याबाबत अशीच तक्रार केली होती. स्थानिक सामाजिक कार्यकर्ते केविन डिसोझा यांनी स्पष्ट केले की बायपास भागाचे पुनर्संचयन अत्यावश्यक आहे. पश्चिम बायपासच्या कामासाठी जे भराव टाकण्यात आले होते, ते मूळ स्थितीत आणले गेले पाहिजेत, असे त्यांनी सांगितले. त्यांनी असा इशाराही दिला की पावसाळ्यापूर्वी काम पूर्ण न झाल्यास पुन्हा एकदा शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होऊ शकते.

व्हिएगस यांनी सांगितले की, नोव्हेंबरमध्येही अशाच स्वरूपाची बैठक झाली होती. त्यात आश्वासने देण्यात आली होती, मात्र प्रत्यक्षात कामे पूर्ण झालेली नाहीत. यावेळी सर्व बैठकांची नोंद लेखी स्वरूपात ठेवली जाणार असून, अपयशाबद्दल संबंधित अधिकाऱ्यांना उत्तरदायी धरले जाईल. नव्याने स्थापन होणारी समिती प्रगतीवर सतत लक्ष ठेवेल, असे त्यांनी सांगितले.

तपासणीदरम्यान नाल्यांची रुंदी, पाण्याच्या प्रवाहाची दिशा अशा तांत्रिक बाबींचीही पाहणी करण्यात आली.

पुनर्संचयनानंतर शेतकरी पुन्हा शेतीसाठी या जमिनींचा वापर करू शकतील, हेच अंतिम ध्येय आहे, असे आमदार व्हिएगस यांनी स्पष्ट केले. तसेच या सखल भागात कोणत्याही प्रकारचा रिअल इस्टेट प्रकल्प उभा राहू देणार नाही, असेही त्यांनी ठामपणे सांगितले. डिसोझा यांनी शेवटी असे सांगितले की, वेस्टर्न बायपास सुरू करताना मूळ आश्वासने देण्यात आली होती, आम्ही केवळ तीच अंमलात आणण्याची मागणी करतो आहोत.

# गोव्यात स्विमिंग पूल सुरक्षा नियमांकडे दुर्लक्ष

■ टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. ८ :** गोव्यातील हॉटेल आणि रिसॉर्टमधील स्विमिंग पूलमध्ये अल्पवयीन मुलांच्या बुडून होणाऱ्या मृत्यूंच्या घटनांमध्ये गेल्या काही महिन्यांत लक्षणीय वाढ झाली असून, यामुळे पूल सुरक्षा नियमावलीच्या अंमलबजावणीबाबत गंभीर चिंता व्यक्त केली जात आहे. विशेष म्हणजे, अशा घटनांची पूर्वानुभूती देणाऱ्या अपघातानंतर काही वर्षांपूर्वी सुरक्षिततेसाठी मार्गदर्शक तत्त्वे प्रसिद्ध करण्यात आली होती. मात्र, त्यांची अंमलबजावणी अजूनही अपूर्ण असल्याचे स्पष्ट होत आहे.

अल्पावधीत घडलेल्या अपघाती बुडण्याच्या या घटनांचा मागोवा घेतल्यास, गेल्या आठ वर्षांतील ही तिसरी लाट ठरते. ही बाब प्रशासनाच्या निष्क्रियतेकडे स्पष्ट इशारा करते.

गोवा राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाचे माजी अध्यक्ष पीटर बोर्जेस यांनी २०२३ मध्ये प्रसिद्ध केलेल्या सुरक्षा निर्देशांकडे संबंधित आस्थापनांनी केलेले दुर्लक्ष अधोरेखित केले. हॉटेल्स जेव्हा फॅमिली पर्यटनातून नफा मिळवतात, तेव्हा मुलांच्या सुरक्षिततेची जबाबदारीही त्यांचीच ठरते, असे बोर्जेस म्हणाले. पूल परिसरात जीवरक्षक नाहीत, योग्य चेतावणी फलक नाहीत आणि अधिकाऱ्यांकडून कोणतीही कारवाई होत नाही. हे अपघात नसून नियोजनशून्यतेचे गंभीर उदाहरण आहे. असे ते म्हणाले .

गोवा राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाच्या निर्देशांनुसार, हॉटेल्स, रिसॉर्ट्स आणि गेस्टहाऊसना पूल परिसरात अनिवार्य प्रशिक्षित जीवरक्षक नियुक्त करणे, बालसुरक्षा अडथळे उभारणे, स्पष्ट फलक लावणे आणि नियमित तपासणी करणे आवश्यक होते. सात वर्षांखालील मुलांसाठी योग्य फ्लोटेशन उपकरणे व लाईफ जॅकेट्स उपलब्ध करून देण्याची शिफारसही आयोगाने केली होती.

बोर्जेस यांनी स्पष्टपणे नमूद केले की, सर्व आस्थापनांचे नैतिक आणि कायदेशीर कर्तव्य आहे की त्यांनी पाहुण्यांच्या, विशेषतः मुलांच्या, सुरक्षेसाठी पुरेशी काळजी घेतली पाहिजे. पूल परिसर बालसुलभ व सुरक्षित ठेवणे ही त्यांची जबाबदारी आहे.

पर्यटन विभागाने स्विमिंग पूलसह कार्यरत आस्थापनांमध्ये पुरेशी संख्येने प्रशिक्षित जीवरक्षक उपस्थित असावेत, अशी आयोगाची शिफारस होती. पूल कार्यरत नसताना पाण्याचा वापर निषिद्ध ठेवावा, असेही आयोगाने स्पष्ट केले होते. केवळ दुर्लक्षामुळे इतकी निष्पाप जीवितं गमावावी लागणे हे अत्यंत वेदनादायक आहे, अशी खंत आयोगाने व्यक्त केली होती.

दरम्यान, जलसंपदा विभागानेही गुरुवारी स्वतंत्र इशारे जारी करत नागरिकांना सिंचन कालव्यांमध्ये पोहण्याचे अथवा त्यांचा वापर मार्ग म्हणून करण्याचे टाळण्याचे आवाहन केले. विभागाच्या मुख्य अभियंत्यांनी नागरिकांना बुडण्याचा धोका टाळा' असा स्पष्ट इशारा दिला आहे.